दै. मराठवाडा नेता दि. ०१/०६/२०२४

## आरोपी अल्पवयीन असल्याचे कारण पुढे करून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न : आज जिल्हाधिकारी यांना निवेदन

# श्रीनगर येथे विद्यार्थ्यांवर हल्ला करणाऱ्या पाच जणांना अटक

नांदेड : (म नेता)

भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील श्रीनगर येथील देगलूरकर यांच्या निवासस्थानी धुडगूस घालून जबर मारहाण करणाऱ्या पाच आरोपींना भाग्यनगर पोलिसांनी ताब्यात घेतले असून इतर आरोपी हे अल्पवयीन असल्याचे कारण दाखवून सदर प्रकरण दडपण्याचा प्रयत्न सुरू आहे. दरम्यान सदर प्रकरणांचा तपास करणाऱ्या अधिकारी यांनी या प्रकरणांचे गांभीर्य कमी करण्याचा प्रयत्न सुरू केले आहेत. तसेच उद्या २ जुलै रोजी राष्ट्रप्रेमी नागरीकांच्या वतीने जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांना निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

नांदेड शहरातील श्रीनगर येथील रंजना किराणा दुकानाच्या बाजूला असलेल्या देगलूरकर यांच्या निवासस्थानी भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्या विजयाचा जल्लोष साजरा करणाऱ्या विद्यार्थ्यांवर रात्री बारा वाजण्याच्या सुमारास मुस्लिम समाजाच्या २० ते २५ टोळक्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर हल्ला केला होता. या हल्ल्यात चार विद्यार्थी हे गंभीर जखमी झाले होते. मुस्लिम टोळक्याने केलेल्या हल्ल्याची तक्रार देण्यास पोलिस ठाण्यात गेले असता तक्रार घेण्यास टाळाटाळ केली.

परंतु सदर प्रकरणात भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी यांनी भाग घेतल्याने भाग्यनगर पोलिसांना गुन्हा दाखल करण्यास भाग पाडले आहे. भाग्यनगर पोलिसांनी आरोपी महंमद नुमान महंमद सिकंदर, शेख नुमान शेख खलील, शेख आयन शेख रौफ, शेख फरहान शेख गफार, अबुजर जिलानी सय्यद, शेख मुजलीम शेख वर आजीद, अर्शद खान हफीज खान, मिर्जा उमर बेग अब्दुल खादीर , अल्ताफ हुसेन अन्वर हुसेन, महंमद कैफ महंमद ताहेर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रत्यक्षात या हल्ल्यात २० ते २५ जणांचा समावेश होता. पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत पाच आरोपी ताब्यात घेतले आहेत. मात्र या हल्ल्यात फक्त तीन आरोपी सज्ञान असून इतर सर्व आरोपी हे नाबालीक असल्याचे सांगून हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्याचप्रमाणे या प्रकरणाचा तपास करणारे अधिकारी मात्र या प्रकरणांचे गांभीर्य न घेता हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करत आहेत.

### अल्पवयीन दाखवून वाचविण्याचा प्रयत्न

**श्रीनगर येथील देगलूरकर यांच्या निवासस्थानी धुडगुस घालून गरीब खेड्यातील मुलांना जबर मारहाण करणाऱ्या काही आरोपींना वाचविण्याचा प्रयत्न भाग्यनगर पोलिस करत असल्याचे दिसून येत आहे. अल्पवयीन असल्याचे कारण दाखविण्यात येत आहे. देगलूरकर यांच्या निवासस्थानी ज्या विद्यार्थ्यांना मारहाण झाली. त्यात काही विद्यार्थी हे अल्पवयीन आहेत. पोलिसांनी सदर अल्पवयीन गुन्हेगार यांना अटक करण्यास टाळाटाळ सुरू केली आहे. सदर आरोपी अटक करण्याची मागणी त्या विद्यार्थ्यांनी केली आहे. अटक करून सुधार गृहात पाठविण्याची मागणी होत आहे.**

### राष्ट्रप्रेमी नागरीक निवेदन देणार

**श्रीनगर येथील देगलूरकर यांच्या निवासस्थानी जाऊन विद्यार्थ्यांवर भ्याड हल्ला करणाऱ्या विरोधात पोलिसांनी तातडीने कारवाई करावी म्हणून उद्या २ जून रोजी राष्ट्रप्रेमी नागरीकांच्या वतीने जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांना निवेदन देण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे जमा होण्याचे आवाहन राष्ट्रप्रेमी नागरीक यांच्या वतीने करण्यात आले आहे.**